Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**February -2022**

(CCCXXXVII ) 337

## The Contribution Of The Great Thinkers And Saints In The Making Of India



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Editor**
**Dr. Maya S. Watane**
**Head, Dept. of Political Science Smt. Kesharbai Lahoti College, Amravati**

**Executive Editor**
**Dr. V. L. Bhangdia**
**Principal**
**Smt. Kesharbai Lahoti College, Amravati**

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Dept. of Political Science**
**Smt. Kesharbai Lahoti College, Amravati**

or Details Visit To : www.aadharsocial.com **Aadhar International Publication**

Impact Factor -8.575 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

## February -2022

ISSUE No- (CCCXXXVII) 337

# The Contribution of the Great Thinkers and Saints in the Making of India

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Prin. Dr. Vijaykumar L. Bhangdia**
**Principal**
Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati..

**Dr. Maya S. Watane**
Head, Dept. of Political Science
Smt. Kesharbai Lahoti Mahavidyalaya, Amravati..

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 42 | जोतीराव फुले यांच्या राजकीय विचारांचे एक चिकित्सक अध्ययन डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 170 |
| 43 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विकासातील योगदान. एक अभ्यास डॉ. वंदना फटाले | 175 |
| 44 | वर्तमान परिवेश में डॉ. आम्बेडकर की प्रासंगिकता निघोंट अर्चना महादेवराव | 177 |
| 45 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील कामगार चळवळीतील योगदान डॉ. दिनेश सहदेवराव धाकडे | 181 |
| 46 | मानवेंद्रनाथ रॉय यांचे राजकीय विचार कुणाल दिलीप राठोड | 184 |
| 47 | आधुनिक हिंदी काव्य में गांधीवादी सामाजिक विचारधारा डॉ ज्योति एन मंत्री | 189 |
| 48 | Gandhi's Khadi-Huts To High Street **Dr. Ravi N Sakhare** | 194 |
| 49 | Dr. B. R. Ambedkar's Philosophy Andmission For Education **Mrs. Deepa D. Patil** | 196 |
| 50 | Gandhian Reflections On Economy –The Need Of The Hour **Dr.Gayatri S. Tiwari** | 199 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 337(CCCXXXVII)
ISSN : 2278-9308
February, 2022

# जोतीराव फुले यांच्या राजकीय विचारांचे एक चिकित्सक अध्ययन''

डॉ. सुभाष दौलतराव उपाते
सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा),
जि. गडचिरोली, Email ID : subhashupate05@gmail.com

साराश:

राजकारण हा मुख्यत: सत्तेचा खेळ आहे. त्याविषयी आपल्या देशातील सर्वसामान्य लोक पूर्वीपासून प्राय: उदासीन होते. तरी देखील राजकीय स्थित्यंतरांचा त्यांच्या जीवनावर जो परिणाम व्हायचा तो होतच होता. इंग्रजांच्या सुनियंत्रित शासनपद्धतीमुळे राज्यसंस्थेचा प्रभाव अधिकाधिक जाणवू लागला होता. त्यामुळे जनसामान्यांच्या हितसंबंधांची जपणूक करणाऱ्या समाजचिंतकांना राजकीय घडामोडींची दखल घेण्याखेरीज गत्यंतर नव्हते. सत्यशोधक समाजाच्या उद्देशपत्रिकेत या समाजात राजकीय विषयांवर बोलणे अजी वर्ज आहे. असे म्हटले असले तरी राज्यकर्त्यांचे धोरण, प्रशासकांची कार्यपद्धती धार्मिक — सामाजिक व्यवस्थेच्या आड दडलेला राजकीय स्वार्थ याकडे जोतीरावांचे बारिक लक्ष्य होते. समाजाच्या दुर्बल घटकांची दैन्यावस्था कशी दूर करता येईल हा एक प्रश्न त्यांच्या मनात रात्रंदिवस घोळत होता. त्यादृष्टीने ते प्रत्येक गोष्टीचा विचार करीत असत. आपल्या कार्यात त्यांनी लोक शिक्षणाला प्राधान्य दिले होते.''१ सत्ता हे देखील समाज परिवर्तनाचे एक महत्वाचे साधन आहे. याचा त्यांना विसर पडला नव्हता. सत्ता गेली की तिच्या पाठोपाठ स्वाभिमान लुप्त होतो. कर्तृत्व लयाला जाते. जोतीराव फुलेंच्या शब्दात ''सत्तेवाचून सकल कळा, झाल्या अवकळा, पुसा मनाला।। गोडी आर्जवाची लागली, लाज सोडली, पडता पाया।।'' (जो.फु. १९९१: ५७०)

प्रस्तावना:

जोतीरावांचा जन्म एका मध्यमवयीय शेतकरी कुटुंबात १८२७ साली झाला. मुळात गोऱ्हे आडनाव असलेले व्यवसायानुसार फूले बनले. फुलेंच्या मित्र परिवारात ब्राम्हण, प्रभू, क्षत्रिय, कायस्थ, मुस्लिम, खिस्ती अशा सगळ्य अठरापगड समाज घटकांचा समावेश होता. म्हणुनच त्यांच्या विचाराच्या कक्षा सर्वसमावेशक झाल्याच्या दिसतात. या ''मित्र परिवारातील परधर्मीय मित्रांकडून हिंदू धर्मावर झालेली टीका ऐकून जोतीरावांना आपल्या धर्मातील अन्याय, उच्चनीचभाव आणि धर्माचरणातील मतलबीपणा याचा पहिल्या प्रथम ज्ञाणीव झाली आणि आपल्या धर्मसंस्थेचे अंतरंग न्यायनिष्ठुरतेने तपासून पाहण्याची त्यांना गरज भासू लागलो.''२ टामस पेन या तत्वज्ञाच्या 'राइट्स ऑफ मॅन' या पुस्तकाचा प्रभाव होता. जोतीरावांना गुलामगिरीची चीड होती. शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या चरित्रातून त्यांची देशभक्तीची भावना जागृत झाली होती. एका ब्राह्मण मित्राच्या वरातीत त्यांचा सनातनी ब्राह्मणांनी अपमान केला तेव्हा जोतीराव संतप्त झाले व नंतर अंतर्मुखही झाले. यातूनच फुलेंना जातिव्यवस्थेचे समूळ उच्चाटन करायचे आणि स्त्री—शुद्रातिशूद्रांच्या सर्वांगीण विकासासाठी व हक्कांसाठी झटायचे अशा प्रकारचे जीविताचे जनू प्रयोजनच सापडले.

मुळ शब्द : सत्ता, स्वातंत्र्य, वर्तमानपत्रे, शुद्रातीशुद्र.

संशोधन लेखाची उद्दिष्टे:

१.म. फुलेंच्या राजकीय सत्तेबाबत अध्ययन करणे.
२.म. फुलेंच्या स्वातंत्र्य कल्पनेबाबत अध्ययन करणे.
३.म. फुलेंच्या वर्तमानपत्राबाबत अध्ययन करणे.

महात्मा फुलेंच्या राजकीय विचारांचे अध्ययन करताना हक्कवंचित घटकांच्या दुर्दशेचे मुख्य कारण अविद्या आहे. तिला सर्वप्रथम दूर सारले पाहिजे. जोतीरावांचा प्राथमिक शिक्षणावर भर होता. तर इतरांसाठी ज्ञानाचे दरवाजे बंद करणाऱ्या ब्राम्हणांना जोतीरावांनी धारेवर धरले. ज्यांनी शुद्रातिशूद्रांवर परोपरीने अन्याय केला, त्यांचा छळ केला त्यांच्या विरूद्ध जोतीरावांनी जन्मभर